लोकमत

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आदिवासी विकास भवन, पहिला माळा, गडकरी चौक, जुना आग्रारोड, नाशिक
दूरध्वनी क्र. 0253-2575615, 2317938 फॅक्स क्र. 2579208
ई-मेल :- admnctd.nsk-mh@gov.in वेबसाइट :- https://tribal.maharashtra.gov.in

# सरळसेवा भरती-२०२३

## गट(ब) अराजपत्रित संवर्ग व गट-क संवर्ग

आदिवासी विकास विभागांतर्गत आयुक्त, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या अधिपत्याखालील तसेच नियुक्ती प्राधिकारी अपर आयुक्त, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर यांच्या आस्थापनेवरील गट(ब) अराजपत्रित व गट क संवर्गातील सरळसेवा कोट्यातील विविध संवर्गातील ६०२ पदांच्या सरळसेवा भरतीकरिता पात्र उमेदवारांकडून विभागाच्या https://tribal.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर फक्त ऑनलाइन पद्धतीने दिनांक २३.११.२०२३ ते १३.१२.२०२३ या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदांच्या भरतीकरिता महाराष्ट्रातील निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर ऑनलाइन (Computer Based Test) परीक्षा घेण्यात येईल.

| अ. क्र. | पदनाम | आयुक्तालय, नाशिक | अपर आयुक्त, नाशिक | अपर आयुक्त, ठाणे | अपर आयुक्त, अमरावती | अपर आयुक्त, नागपूर | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उच्चश्रेणी लघुलेखक | ३ | ० | ० | ० | ० | ३ |
| २ | निम्नश्रेणी लघुलेखक | १३ | ० | ० | ० | ० | १३ |
| ३ | वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक | ० | ७ | ३ | ४ | ० | १४ |
| ४ | संशोधन सहाय्यक | ० | ४ | ५ | ५ | ३ | १७ |
| ५ | उपलेखापाल/मुख्यलिपिक | ० | १७ | ११ | ८ | ५ | ४१ |
| ६ | वरिष्ठ लिपिक/सांख्यिकी सहाय्यक | ० | ५७ | ४७ | ४३ | ४० | १८७ |
| ७ | लघुटंकलेखक | ० | ३ | ० | २ | ० | ५ |
| ८ | गृहपाल (पुरुष) | ० | १३ | १० | १३ | ७ | ४३ |
| ९ | गृहपाल (स्त्री) | ० | ०९ | ५ | ६ | ५ | २५ |
| १० | अधीक्षक (पुरुष) | ० | १० | १२ | ० | ४ | २६ |
| ११ | अधीक्षक (स्त्री) | ० | २० | २२ | १ | ५ | ४८ |
| १२ | ग्रंथपाल | ० | १४ | १६ | १ | ७ | ३८ |
| १३ | प्रयोगशाळा सहाय्यक | ० | ११ | १३ | ० | ५ | २९ |
| १४ | आदिवासी विकास निरीक्षक | ० | १ | ० | ० | ७ | ८ |
| १५ | सहाय्यक ग्रंथपाल | ० | ० | १ | ० | ० | १ |
| १६ | प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | ० | ० | ० | ० | २७ | २७ |
| १७ | माध्यमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | ० | ० | ० | ० | १५ | १५ |
| १८ | उच्च माध्यमिक शिक्षण सेवक | ० | ० | ० | ० | १४ | १४ |
| १९ | प्राथमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) | ० | ० | ० | ० | ४८ | ४८ |
| | एकूण | १६ | १६६ | १४५ | ८३ | १९२ | ६०२ |

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाइन पद्धतीने अर्ज नोंदणी सुरू होण्याचा दिनांक | २३.११.२०२३ | दुपारी १५.०० वा. पासून |
| २ | ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा व विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | १३.१२.२०२३ | रात्री २३.५५ पर्यंत |

१) परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र, प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल. संभाव्य बदलाबाबत वेळोवेळी आदिवासी विकास विभागाच्या https://tribal.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती प्रसारित केली जाईल.

२) ऑनलाइन अर्ज भरण्याची पद्धत व ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी https://tribal.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी तसेच संवर्ग निहाय भरावयाची पदे, पदांचा तपशील, वेतनश्रेणी, विहित वयोमर्यादा/वयोमर्यादा शिथिलता, निवड पद्धत, सर्वसाधारण अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतुदी, पदनिहाय ऑनलाइन परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा शुल्क, अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादी तपशील https://tribal.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल.

३) स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदाच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. तसेच दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा शासन विहित नियमानुसार विचार केला जाईल. सदरील पदभरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारी, उद्भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना राहतील.

स्वाक्षरीत/-
नयना गुंडे भा.प्र.से.
आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

(Dgipr No. 2023-24/क्र.5/C-5014)